जगभर

दोन निवडणुका

चंद्रशेखर पुरंदरे

पाच एप्रिलला अफगाणिस्तानात अध्यक्षीय निवडणुका झाल्या. लोकशाही संदर्भात ही 'घटना' आहे की एका प्रक्रियेची सुरुवात आहे हे आज निश्चितपणे सांगता येणार नाही पण निव्वळ घटना म्हणूनही ती महत्त्वाची आहे.

गेली १२ वर्षे अमेरिकेच्या आक्रमणापासून तिच्या व NATO च्या (North Atlantic Treaty Orgranisation - अमेरिका व प्रामुख्याने पश्चिम युरोपीय देशांची लष्करी संघटना) वरदहस्ताने व नंतर हेराफेरीच्या निवडणुकीने सत्ताधीश असणाऱ्या हमीद करझाईंची कारकीर्द संपुष्टात आणणारी ही निवडणूक. यातील महत्त्वाचे घटक म्हणजे निवडणुका होणे, त्या बऱ्यापैकी शांततेत पार पडणे, त्यात जवळजवळ ६०% प्रामाणिक मतदान होणे आणि स्त्रियांनी त्यात लक्षणीय सहभाग घेणे. या प्रत्येक घटकाची पार्श्वभूमी पाहता घटनेचे गांभीर्य लक्षात यावे.

निवडणुका जाहीर झाल्या झाल्या धार्मिक मूलतत्त्ववादी तलेबान व अल्-कईदाचे तेथील उरलेसुरले सैनिक यांनी निवडणुकांना विरोध जाहीर केला. लोकांना मतदानापासून परावृत्त करण्यासाठी त्यांच्या नेहमीच्या दहशतवादी तंत्राचा अवलंब केला जाईल असेही बजावले. त्यानुसार काही तुरळक प्रसंग घडलेही. मार्चच्या शेवटच्या पंधरवड्यात उत्तर अफगाणिस्तानातील एका शहरातील बाजारात एक आत्मघातकी बॉम्बस्फोट झाला व स्थानिक निरपराध लोक मारण्यात आले; मग एका स्वीडिश पत्रकाराचा काबूल या राजधानीतच खून झाला; मग तेथीलच एका हॉटेलात चार सशस्त्र हल्लेखोरांनी चार परदेशी व पाच स्थानिकांचा खून केला. या सगळ्या हल्ल्यांची जबाबदारी तलेबानने घेतली. या हत्यांचे दोन-तीन परिणाम झाले. एकतर युनो, अनेक सेवाभावी संस्था, देणगीदार संस्था अशा आंतरराष्ट्रीय संघटनांनी देशातील उपस्थिती कमी केली. दुसरा परिणाम म्हणजे निवडणुका होतात का नाही हाच संदेह निर्माण झाला. तिसरा परिणाम म्हणजे निवडणुका स्वच्छ व निष्पक्षपाती होतील हे पाहण्यासाठी परदेशी निरीक्षक येणार होते. बहुतेकांनी तो कार्यक्रम रद्द केला. त्यामुळे झाल्या तरी निवडणुकांची विश्वासार्हता संशयात्मक झाली.

पण निवडणुका झाल्या. त्या फार विस्तृत हिंसाचार न होता पार पडल्या. एकूण सुमारे ६००० मतदानकेंद्रांपैकी सुमारे २०० तलेबानच्या धमकीमुळे उघडू शकली नाहीत. तरीही बहुसंख्य मतदार मतदान करू शकले. नागरी संघटना, पत्रकार यांनी धाडसाने मतदानात अपप्रकार घडत नाहीत यावर देखरेख ठेवली. निवडणुकीतील गैरप्रकारांची दखल घेण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या कमिशनकडे ज्या तक्रारी आल्या, त्यातील प्रत्येकीची चौकशी होईल असे आश्वासन निवडणूक आयोगाने दिले आहे. तलेबानचा बालेकिल्ला असणाऱ्या कंदाहार प्रदेशातील २००९ च्या निवडणुकांदरम्यान ३० बॉम्बहल्ले झाले होते. तेथे यावेळी एकही अशी घटना घडली नाही. शांतता व सुव्यवस्थेची संपूर्ण जबाबदारी अफगाण सैन्य व पोलिसांकडे असणारी ही पहिलीच निवडणूक होती. आजवरच्या निवडणुका अमेरिका-नेटोच्या देखरेखीखाली होत व स्थानिक पोलीस दुय्यम भूमिका घेत असत. म्हणजे या दहा-बारा वर्षांत स्थानिक पोलीस बऱ्यापैकी सक्षम झालेले दिसते.

जवळजवळ ६०% मतदान झाले म्हणजे तलेबानच्या धमक्यांना बहुसंख्य मतदारांनी दाद दिली नाही. अर्थात मतदान ही तलेबानविरोधी कृती म्हणून कितीजणांनी मतदान केले, एखाद्या विशिष्ट उमेदवारासाठी कितीजणांनी व लोकशाहीवरील विश्वासाची ग्वाही म्हणून कितीजणांनी हे कोणत्याही निवडणुकीसारखे संदिग्ध असले तरी टक्केवारी भारतातील मतदानाशी तुलना करता येण्यासारखी आहे.

निवडणुकीतील स्त्रियांचा सहभाग हा आकडेवारीपेक्षा गुणवत्तेच्या कसोटीवर पहायला हवा. तलेबानच्या शरियाच्या मुस्लीम पोथीनिष्ठ समजुतीनुसार स्त्रिया पडदानशीन, घरातच राहिल्या पाहिजेत. बालविवाह श्रेयस्कर; मग शिक्षण, नोकरी, सार्वजनिक सहभाग या कशाचाच त्यांना अधिकार नाही. या जाचक, गर्भित व प्रत्यक्ष हिंसेच्या दडपणातून अफगाण स्त्रिया बाहेर पडलेल्या दिसल्या ही मोठी प्रगती आहे.

आता या निवडणुकीनंतरचे संभाव्य चित्र पाहू. निवडणूक संपलेली नाही. अध्यक्ष व उपाध्यक्ष या पदांचे उमेदवार एकत्र असतात. ज्याला पहिल्या फेरीत ५०% हून अधिक मते मिळतात, तो विजयी होतो. तो निकाल एप्रिल अखेरीपर्यंत लागेल. या निवडणुकीत ५०%हून अधिक मते आता झालेल्या पहिल्या फेरीत कोणालाच मिळतील असे वाटत नाही. मग पहिल्या दोन क्रमांकांच्या उमेदवारांत दुसरी फेरी होणार, त्याचा निकाल मे अखेरीपर्यंत लागणे अपेक्षित आहे किंवा जूनही उजाडेल. तोपर्यंत

करझाईच अध्यक्ष राहणार. विशेषत: दुसऱ्या फेरीतील मतमोजणीत मोठी हेराफेरी होण्याची शक्यता आहे. उमेदवारांतील सौदेबाजीही तेव्हा वाढेल. उमेदवारांनी दडपण न आणणे त्यांच्याच हिताचे आहे. कारण विजयी उमेदवार संपूर्ण देशाचा अध्यक्ष होणार, केवळ त्याच्या मतदारांचा नाही.

या संदर्भात विद्यमान अध्यक्ष करझाईंची भूमिका महत्त्वाची ठरेल. ते सहजासहजी व शांतपणे निवृत्त होतील असे दिसत नाही. उमेदवार कोण असावेत इथपासून त्यांनी ढवळाढवळ केली आहे. स्वत:च्या भावासकट काही इच्छुकांना प्रथम त्यांनी निवडणुकीपासून परावृत्त केले. मग दोन संभाव्य उमेदवारांना प्रत्येकी चाळीस हजार डॉलर्स दिले. म्हणजे त्यातील कोणीही निवडून आला तरी तो करझाईंच्या शब्दाबाहेर जाणार नाही! निवडणुकांतील तक्रार आयोगावर त्यांनी 'आपली' माणसे नेमली आहेत म्हणजे तक्रारींचे हवे तसे 'नियोजन' होईल!

करझाईंकडील अतोनात बेहिशेबी पैसा त्यांना ताकद देतो. एका गैरसरकारी अमेरिकन अहवालानुसार सी.आय.ए.या सरकारी गुप्तहेर संघटनेने आजवर करझाईंना अब्जावधी डॉलर्स बेहिशोबी दिले आहेत. अशाच रकमा इराणकडूनही त्यांच्याकडे आल्या आहेत. देशाची धोरणे आपल्याला अनुकूल असावीत यासाठी दिलेली ही लाच आहे. तिचा विनियोग त्या कारणासाठी फारसा झालेला नाही. हा पैसा आगामी सरकारची धोरणे ठरवण्यासाठी ते वापरतील ही दाट शक्यता आहे. म्हणजे, करझाई उद्या अध्यक्ष नसतील तरी पडद्यामागून सूत्रे हलवू शकतात आणि निर्वाचित अध्यक्षाचे स्वातंत्र्य कमी होऊ शकते.

२०१४ ला अमेरिका व NATO अफगाणिस्तान सोडेल. त्यानंतर त्यांचे सुमारे बारा हजार सैनिक सामाजिक सुरक्षा व स्त्रियांचे अधिकार यासाठी अफगाण पोलिसांना प्रशिक्षण देण्यासाठी काही वर्षे तरी राहतील असा अमेरिका व NATO चा प्रस्ताव आहे. या करारावर ३१ डिसेंबर २०१३ पर्यंत करझाईंनी संमतीदर्शक सही करणे अपेक्षित होते. त्यांनी ते आजवर केलेले नाही. हे कवच दूर होताच तलेबान पुन्हा डोके वर काढेल, सामाजिक सुरक्षा धोक्यात येईल ही उद्योगांची व स्त्री संघटनांची भीती आहे. या कराराला अफगाणिस्तानाच्या ज्येष्ठांच्या संघटनेनेही (लोया जिर्गा) संमती दिली आहे तसेच अध्यक्षीय उमेदवारांनीही. पण आजमितीला अफगाणिस्तान-अमेरिका संबंध इतके बिघडलेले आहेत की क्रायमियाच्या रशियातील विलीनीकरणाला पाठिंबा देणारा अफगाणिस्तान हा जगातला फक्त तिसरा देश आहे. करझाईला व्यक्तिश: दुखवण्यापर्यंत कोण किती मजल मारेल हे आजघडीला अनिश्चित आहे.

अफगाणिस्तानात वांशिक निष्ठा देशावरच्या किंवा लोकशाहीवरील निष्ठेपेक्षा बळकट आहेत. लोकशाही तर काल-परवा आली. पुश्तून ही प्रमुख जमात दक्षिणेत आहे तर उझ्बेक व ताजिक या पूर्वेत व उत्तरेत. उमेदवारांपैकी एक उझ्बेक (उपाध्यक्ष) व एक अर्ध-तजिक, अर्ध-पुश्तून आहेत. उरलेले पुश्तून (पठाण) आहेत. निवडून कोण येतो यावर ही बेरीज-वजाबाकी देशांतर्गत संधी-सलोखे किंवा संघर्ष ठरवेल.

याखेरीज अफगाणिस्तानातील एकूण सामाजिक अविकास, पाकिस्तान आणि इराणची सततची ढवळाढवळ, अफूची वाढती लागवड व वाढती व्यसनाधीनता हे प्रश्न आहेतच. म्हणजे, निवडणुका हा पहिला टप्पा पार पडला हे स्वागतार्ह असले तरी पश्चिमेच्या कुबड्यांखेरीज नवनिर्वाचित सरकार स्वत:च्या पायावर कितपत स्थिर राहील हे आजतरी अनिश्चित दिसते.

परत, निवडणुका होऊ देणे हा तलेबानच्या व्यूहरचनेचा भाग असू शकतो. त्यामुळे पुढचे काही महिने महत्त्वाचे ठरतात.

भारतीय निवडणुकांवरील पाश्चात्त्य प्रतिक्रिया

भारतीय पंचवार्षिक निवडणुका हे पश्चिमेत कायमच कुतूहल राहिलेले आहे. एकीकडे हा कुंभमेळ्याचा राजकीय आविष्कार, जगातील एक आश्चर्य मानले जाते. पहा, हा गरीब, मागासलेला देशसुद्धा लोकशाही आहे, यामागे 'अशा देखाव्यांनी हा देश थोडाच आमच्या बरोबरीला येणार' ही खरी भूमिका असते, दुसरीकडे राजकारण हे इष्ट समाजपरिवर्तनाचे साधन मानले जाते, त्यासाठी लोकशाही स्तुत्य मूल्य ठरते. या दोन्ही भूमिकांतून पश्चिमेची प्रतिक्रिया दिसते. येथील माध्यमांमध्ये भारतातील निवडणुकीची सातत्याने व ठसठशीतपणे दखल आहे. अर्थातच एवढ्या प्रचंड संख्येने मतदार, त्यातही १५ कोटींहून अधिक प्रथम मतदार; मतदानाचे नियोजन, निवडणूक खर्चावरची देखरेख आणि संशयातीत स्वच्छ निवडणुका हे विस्मयकारक घटक नोंदले जातात. त्याबरोबरच निवडणुका हा लोकशाहीचा एक भाग मात्र आहे. मूलभूत लोकशाही हक्क, कायद्यासमोर धर्म-वंश-लिंग वगैरे घटकनिरपेक्ष समता, शोषणाचा अभाव इत्यादी घटक लोकशाहीचा तितकाच, किंबहुना अधिक महत्त्वाचा भाग आहेत, त्याबाबत भारत अपुरा पडतो आहे ही नोंद आहे. बालमजुरी,स्त्रियांविरुद्धचे वाढते अत्याचार, आर्थिक प्रश्नांबाबत नोकरशाहीची बुरसट वर्तणूक इत्यादी सामाजिक प्रश्नांची दखल आहे.

घराणेशाही विरुद्ध एक व्यक्ती या दृष्टीने काँग्रेस-बीजेपी स्पर्धेकडे भारतीय प्रचारमाध्यमांसारखेच पाहिले जाते. पश्चिमेच्या दृष्टीने भारत-पाकिस्तान या अण्वस्त्रक्षम देशांमधील संबंध हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. मोदींची पार्श्वभूमी पाहता उद्या भारत-पाकिस्तान संघर्षाची वेळ आलीच तर मोदी सरकारची भूमिका काय राहील याबाबत चिंता व्यक्त केली जाते. प्रमुख निवडणूक या दोन पक्षांत असली तरी जयललिता, ममता यांचे प्रादेशिक

(पान ३० वर)

जगभर *(पान ११ वरून)*

पक्ष सत्तेचे समीकरण ठरवतील असाही अंदाज आहे. आपल्याकडचे उदारमतवादी जसा वारंवार गोध्राचा मुद्दा मोदींच्या संदर्भात लावून धरतात, त्याचीही येथे आठवण काढली जाते पण त्याचबरोबर सगळ्या चौकशी समित्यांनी त्यांना निर्दोषी ठरवले आहे हेही नमूद केले जाते. ब्रिटनने त्यांच्या प्रवासावरचे निर्बंध जसे तीन वर्षांपूर्वी शिथिल केले, तसेच अमेरिकाही लवकरच करेल असे म्हटले जाते.

मुक्त अर्थव्यवस्था, परदेशी भांडवलला पोषक वातावरण हे इतर जिव्हाळ्याचे मुद्दे आहेत. औद्योगिकीकरण प्रसंगी उफराट्या दिशेने चालले आहे, इतक्या खोलात कोणी जात नाही. मनमोहन सिंगांच्या पहिल्या कारकीर्दीची स्तुती केली जाते, तर दुसरी कारकीर्द निष्क्रिय, निष्प्रभ व भ्रष्टाचारी असल्याचे जाहीर होते.

हे दोन प्रमुख पक्ष सोडता 'आप'चा फक्त उल्लेख होतो. 'आप'चा भ्रष्टाचारविरोधी आवाज नोंदला जातो. मात्र हा पक्ष बोलतो किती आणि करतो किती या अनिश्चिततेमुळे त्याला फार महत्त्व दिले जात नसावे.

भारतीय कॉर्पोरेटस् परदेशातील बेकायदा पैसा निवडणुकांसाठी भारतात आणतात व राजकीय पक्षांचा प्रचारखर्च त्यावर चालतो. मोठ्या नेत्याच्या एकेका सभेसाठी होणारा खर्चाचा अंदाज दिसला जातो व हा करोडो रुपयांचा खर्च ही सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचाराची गंगोत्री आहे हे नमूद केले आहे. मुळात देशातील दारिद्र्य, कुपोषण, कुशिक्षण व हिंसाचार या मुद्द्यांवर आपल्याकडचे पक्षही बहुश: मूग गिळून असतात तर पाश्चात्त्य माध्यमात, तेही निवडणुकीसंदर्भात, ती दखल अपेक्षित नसावी.

Email - artnondeco@yahoo.co.uk
Website - www.art-non-deco.com